# महाराष्ट्र शासन

क्र: वाटप-२०१७/३१/प्र.क्र.१२/नाजकधा-२
नगर विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ११ जून, २०१९

दुरध्वनी क्र.०२२-२२०२९४५७
E-mail-samadhan.khatkale@nic.in

प्रति,

जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (नाजकधा),
बृहन्मुंबई/ठाणे/नाशिक/पुणे/कोल्हापूर/
सांगली/सोलापूर/नागपूर,
नागरी समूह.

**विषय** : नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २० अन्वये मंजूर गृहनिर्माण योजनांमधील सदनिकांचे दर निश्चित करणेबाबत...

**संदर्भ** : जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे यांचे पत्र जा.क्र.युएलसी/टिए/एटीपी/१/२०१७/५१, दि.३०.०१.२०१७

महोदय,

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २० अन्वये मंजुर योजनेअंतर्गत दूर्बल घटकांसाठी सदनिकांच्या शासनमान्य दराबाबत व पूर्ण झालेल्या इमारतींना अभिहस्तांतरणासाठी ना-हरकत देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्रानुसार शासनास प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावातील सर्वसाधारण वस्तुस्थिती विचारात घेवून त्या अनुषंगाने सर्व नागरी समुहांच्या जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

अ) नाजकधा कलम २० अन्वये मंजूर योजनेंतर्गत इमारतींना, यापूर्वीच "भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना-हरकत" देण्यात आली असेल तर, अशा संबंधित नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना संबंधीत जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी यांनी अभिहस्तांतरणासाठी ना-हरकत द्यावी. तथापि, उक्त क्षेत्राच्या मिळकतीच्या इतर हक्कामध्ये "नाजकधा कलम २० अन्वये सूटीखालील क्षेत्र" अशी नोंद कायम राहील.

ब) नाजकधा कलम २० अन्वये मंजूर योजनेंतर्गत इमारतींना, अद्याप "भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना हरकत" देण्यात आली नसेल तर, संबंधित योजनाधारक / विकासक यांनी योजनेच्या अटी व शर्तीची पूर्तता केल्याची बाब तपासून व गृहनिर्माण संस्था नोदंणीकृत झाल्यानंतर त्या संस्थांना संबंधीत जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी यांनी अभिहस्तांतरणासाठी ना-हरकत द्यावी. तथापि, उक्त क्षेत्राच्या मिळकतीच्या इतर हक्कामध्ये "नाजकधा कलम २० अन्वये सूटीखालील क्षेत्र" अशी नोंद कायम राहील.

क) सर्व नागरी समुहातील नाजकधा कलम २० खालील योजनामधून प्राप्त होणाऱ्या सदनिकांसाठी खालीलप्रमाणे नमुद सुत्रानुसार सदनिकांचे दर निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत असुन, आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

*नाजकधा कलम २० खालील योजनांमधून प्राप्त होणा-या सदनिकांचे "खुल्या बाजारातील" विक्रीचे दर = (अ) नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमानुसार देय असलेल्या जमिनीच्या किंमतीच्या पाचपट रक्कम + (ब) प्रचलित बांधकाम खर्च + [(अ) +(ब) या रकमेवर १५% नफा]*

*"खुल्या बाजारात विक्रीसाठी असलेल्या सदनिकांच्या होणाऱ्या किंमतीच्या ७५% किंमत शासन निर्देशित व्यक्तींना आकारण्यात यावी."*

आपला,

(समाधान खटकाळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत : निवडनस्ती(नाजकधा-२)